महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ मंगळवार, दि. १२, ऑगस्ट २०२५ ■

# मध्यवर्ती बसस्थानकावर प्रवाशाला लुटले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

मध्यवर्ती बसस्थानकावर प्रवाशाला मारहाण करून लुटणाऱ्या दोन आरोपींना गणेशपेठ पोलिसांनी अटक केली आहे. स्वप्निल राजेंद्र कांबळे (२८) रा. आर्णी, यवतमाळ आणि राजेश खान सिंह कटरे (४२) रा. जयहिंदनगर, पारडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. फिर्यादी प्रशांत रामदास वाकुले (३०) रा. विटाभट्टी चौक, यशोधरानगर यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला होता.

वाकुले यांना काही कामानिमित्त गावी जायचे होते. गत शुक्रवारच्या रात्री ९.४५ वाजताच्या सुमारास ते गणेशपेठ ठाण्यांतर्गत मध्यवर्ती बसस्थानकावर आले. मुख्य प्रवेशद्वारावर उभे राहून बसची प्रतीक्षा करीत असताना वरील दोन्ही आरोपी त्यांच्याजवळ आले. विनाकारण शिविगाळ करीत त्यांना मारहाण सुरू केली. त्यानंतर त्यांना धमकावून जबरीने मोबाईल आणि खिशातील रोख असा एकूण १५,८०० रुपयांचा माल हिसकावला आणि ऑटोमध्ये बसून पळून गेले. वाकुले यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता आरोपींच्या ऑटोचा नंबर मिळाला. या आधारावर पोलिस त्यांच्यापर्यंत पोहोचले. ताब्यात घेऊन विचारपूस केली असता आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी दोघांनाही अटक केली. चौकशीदरम्यान आरोपी कांबळे हा मुळचा आर्णी येथील रहिवासी असून सध्या बसस्थानकासमोरील पदपाथावर राहतो, तर कटरे हा ऑटो चालक आहे.

# पारंपारिक रानभाज्यांची चव नव्या पिढीपर्यंत पोहचण्याची आवश्यकता : ॲड. आशिष जयस्वाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

पाश्चिमात्य फास्टफुडपेक्षा आपल्याला निसर्गाकडून विविध चवींच्या व आरोग्याला हितकारक अशा रानभाज्या मिळालेल्या आहेत.

श्रावण महिन्यात या आरोग्यदायी पौष्टिक व औषधी गुणयुक्त असलेल्या रानभाज्या मुबलक प्रमाणात आपल्या भोवताली उपलब्ध असतात. नागरिकांनी आरोग्याचे भान ठेवून फास्टफुडच्या आहारी जाणाऱ्या युवा पिढीपर्यंत पारंपारिक रानभाज्यांची चव व आरोग्यमूल्य पोहचवावेत, असे आवाहन कृषी राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल यांनी केले. जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. रामनगर मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या या रानभाजी महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर,



## जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे उद्घाटन

नागपूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे, आत्माच्या प्रकल्प संचालिका डॉ. अर्चना कडू, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे आदी उपस्थित होते.अनेक आरोग्यवर्धक गोष्टी आपल्या भोवती मुबलक प्रमाणात निर्सगात उपलब्ध आहेत. नव्या पिढीपर्यंत या रानभाज्यांचे ज्ञान पोहचले पाहिजे. जूनी चव व नवी पिढी असे नाते युवकांच्या मनात निर्माण झाले पाहिजे, असे कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी सांगितले. महिला बचतगटांनी यासाठी अधिक सजग होऊन पुढाकार घेतल्यास उमेदमार्फत त्यांना चालना देऊ, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकरी व ग्राहक यांचा थेट संपर्क जुळला पाहिजे. जिल्ह्यात बचतगटांना चालना देण्यासाठी आपण उमेद मॉल उभारत असल्याचे त्यांनी सांगितले. हा दोन दिवसीय रानभाजी महोत्सव दिनांक 12 ऑगस्ट रोजी सकाळी 11 पासून सुरु राहणार असल्याचे आत्माच्या प्रकल्प संचालिका डॉ. अर्चना कडू यांनी सांगितले. जिल्हास्तरावरील या रानभाजी महोत्सवाला मोठ्या प्रमाणावर भेट द्यावी असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# घराच्या स्वप्नांना पंख
## आ. डॉ. आशिष देशमुख



■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. ११ :

अनेक वर्षांपासून स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पाहणाऱ्या सावनेर आणि कळमेश्वर तालुक्यातील शेकडो गरजू नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमधून पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना ८ ऑगस्ट२०२५ ला अधिकृतपणे भूखंडांचे पट्टे वाटप करण्यात आले. आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या हस्ते झालेल्या या कार्यक्रमामुळे अनेकांच्या जीवनात आनंदाचा क्षण आला. पट्टे मिळाल्यानंतर अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान स्पष्ट दिसत होते. आता आमचे स्वतःचे घर होईल, अशा भावना अनेक लाभार्थ्यांनी व्यक्त केल्या. या उपक्रमाने ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या अधिक स्थैर्य मिळण्यास मदत होणार आहे.

आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून सर्व लाभार्थ्यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, शासनाच्या योजनांचा खरा लाभ गरजूपर्यंत पोहोचवणे हेच माझे ध्येय आहे. प्रत्येक पात्र व्यक्तीला त्याचा हक्क सन्मानाने मिळवून देण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. हा महत्त्वपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी अनेक प्रशासकीय अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

यात प्रामुख्याने भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. राजीव पोतदार, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे, गटविकास अधिकारी मनोजकुमार हिरुडकर, अंशुजा गराटे, सावनेरचे तहसीलदार अक्षय पोयम आणि कळमेश्वरचे तहसीलदार विकास बिक्कड यांचा समावेश होता. याशिवाय, स्थानिक नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या पट्टे वाटपामुळे ग्रामीण भागातील विकासाला गती मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# नागपूरमध्ये अँथे २०२५ लाँच
## केंद्रीयमंत्री नितीन गडकरींच्या हस्ते उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

विद्यार्थ्यांच्या आकांक्षांना योग्य दिशा देण्यासाठी आणि देशासाठी खरे समस्या सोडवणारे तयार करण्याच्या उद्देशाने आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड ने त्यांच्या प्रतिष्ठित आकाश नॅशनल टॅलेंट हंट एक्झाम अँथे २०२५ ची घोषणा केली. या कार्यक्रमाचे नागपूरमध्ये केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते लाँच करण्यात आले.

प्रमुख मुद्देः इयत्ता ५वी ते १२वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा. २५० कोटींपर्यंत १००% शिष्यवृत्ती आणि रु २.५ कोटींची रोख पारितोषिके. ऑनलाइन परीक्षाः १२ ऑक्टोबर २०२५, ऑफलाइन परीक्षाः ५ आणि १२ ऑक्टोबर २०२५.

मागील वर्षी १० लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग – नवा विक्रम. नीट आणि जेई टॉपर्सनी अँथेपासूनच सुरुवात केली. आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड ने आकाश इन्व्हिक्टस एस टेस्ट नावाची आणखी एक राष्ट्रीय स्तरावरील




शिष्यवृत्ती परीक्षा जाहीर केली आहे. ही परीक्षा खास जेई ॲडवॉन्स तयारीसाठी असून ती २४ ऑगस्ट, ३१ ऑगस्ट आणि ७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे.

नोंदणीची माहितीः ऑकाश च्या वेबसाईट ऑनलाईन वर उपलब्ध आहे. किवा आकाश जवळच्या कार्यालयात संपर्क साधावा. परीक्षा शुल्कः ३००/- रु (लवकर नोंदणीवर ५०% सूट) आकाश एज्यु स. लि.चे सीईओ दीपक मेहरोत्रा यांनी सांगितले की, अँथे आज देशातील सर्वात मोठी आणि प्रतिष्ठित शिष्यवृत्ती परीक्षा बनली आहे.

आमचा उद्देश प्रत्येक गुणवंत विद्यार्थ्याला आर्थिक परिस्थितीची अडचण न येता सर्वोत्तम शिक्षण देणे आहे. त्यावेळी उपस्थित असलेल्या इतर मान्यवरांमध्ये डॉ. मृणाल पाठक, डीन (शैक्षणिक), एम्स नागपूर आणि आकाश लि. चे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश होता. अँथे२०२५ एस टेस्ट या दोन्ही परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना नीट, जेई आणि इतर स्पर्धा परीक्षांसाठी सर्वोत्तम मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध होणार आहेत.

# विजेपासून संरक्षण जागरासाठी नागपूर जिल्ह्यात फिरत्या वाहनाद्वारे प्रसिध्दी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

कोसळणाऱ्या विजेपासून स्वतःला वाचविण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी याउद्देशाने विजेच्या सुरक्षिततेकरीता आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत व्यापक जनजागृती केली जात आहे. नागपूर जिल्ह्यात ग्रामीण भागात याबाबत जनजागृती करण्यासाठी उमरेड व रामटेक तालुक्यात फिरत्या वाहनाद्वारे डिजीटल स्क्रीनच्या सहाय्याने परिपूर्ण अशा व्हॅनला जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी हिरवी झेंडी दाखवून रवाना केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, आपत्ती जिल्हा व्यवस्थापन अधिकारी अंकुश गावंडे व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# विक्रीच्या तयारीत असतानाच पोलिसांनी पकडले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

नंदनवन ठाण्यांतर्गत चालकाला मारहाण करून जबरीने ट्रक पळवून नेणाऱ्या दोन आरोपींना गुन्हे शाखा युनिट ४ आणि नंदनवन पोलिसांच्या संयुक्त पथकाने सापळा रचून अटक केली. आरोपींनी ट्रक पळविल्यानंतर यशोधरानगर ठाण्यांतर्गत निर्जनस्थळी ठेवला होता. ते पोलिस आणि फियार्दीच्या हालचालींवर लक्ष ठेवून होते. प्रकरण शांत होताच ट्रकची विक्री करणार होते, मात्र आधीच पोलिस त्यांच्यापर्यंत पोहोचले. रफीक उर्फ काल्या खान वहिद खान (३७) आणि शेख निसार शेख कादिर (३६) दोन्ही रा. मोठा ताजबाग, सक्करदरा अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून ट्रकसह एकूण ४ लाख ६० हजार रुपये किंमतीचा माल जप्त केला आहे.

दोन्ही आरोपी हे सराईत गुन्हेगार असून पोलिस अभिलेखावर आहेत. यापूर्वी त्यांना बॅटरी चोरीत पकडण्यात आले आहे. फियार्दी विशाल परसराम वाहणे (४५) रा. कौशल्यानगर धोबी मोहल्ला, अजनी हे एमएच-३१/सीबी-३१९७ क्रमांकाच्या ट्रकवर चालक आहेत. गत गुरूवारी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास ते ट्रक घेऊन नंदनवनच्या प्रजापती चौकातून वैष्णोदेवी चौकाकडे जात होते. उड्डाण पुलावर हल्दीराम यांच्या घरापुढे दुचाकीने आलेल्या दोन्ही आरोपींनी त्यांच्या ट्रकपुढे वाहन उभे करून रस्ता अडवला. शिविगाळ करीत त्यांच्यावर दगडफेक केली. जबरीने कॅबिनमध्ये घुसून त्यांना ओढत बाहेर काढले आणि मारहाण केल्यानंतर ट्रक घेऊन पसार झाले. विशाल यांनी नंदनवन पोलिसात घटनेची तक्रार केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. या गुन्ह्याचा समांतर तपास युनिट ४ च्या पथकानेही सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी फुटेज तपासली असता वरील आरोपींचा सुगावा लागला. पोलिसांनी सापळा रचून दोघांनाही ताब्यात घेतले.

# चळवळ गतिमान करण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा : डॉ. सुरेश माने

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

एस सी, एस टी, ओबीसी बहुजन महीला आजही राजकीय, सामाजिक दृष्ट्या जागृत नाही त्यामुळे त्यांच्यावर अन्याय अत्याचार होतात, त्यांना न्याय मिळत नाही, त्यासाठी महिलांना त्यांच्या अधिकारासाठी जागृत करण्यासाठी फुले - आंबेडकरी चळवळ गतिमान करण्याची गरज आहे,त्यात महिलांनीही पुढाकार घ्यावा असे आवाहन बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष एड डॉ सुरेश माने यांनी




केले. डॉ. सुरेश माने विदर्भ प्रदेश बी आर एस पी महिला आघाडी तर्फे उत्तर अंबाझरी मार्गावरील अमृत भवन येथे बहुजन महीला अधिकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की आगामी काळ देशासाठी फार कठीण आहे असे दिसते. संविधानाची पायमल्ली करून देशाचा कारभार सुरू आहे. तुमच्या अधिकारावर गदा येत आहे. याचाच एक भाग म्हणून येत्या १९ ऑगस्ट रोजी संसद अधिवेशनात नवी दिल्ली येथे जंतर मंतर येथे संविधान सन्मान संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.असे हि त्यांनी सांगितले.

याप्रसंगी मुख्य वक्त्या नंदा फुकट म्हणाल्या की महिलांनी फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांची कास धरून आपले अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष करावा. यवतमाळ जिल्हा बी आर एस पी नेत्या डॉ सुनंदा वालदे यांनी महिलांना आवाहन केले की, कांशीराम यांची चळवळ गतिमान करण्यासाठी डॉ. सुरेश माने फार परिश्रम घेत आहेत.

# ऑपरेशन सारथी निर्भय सुरक्षा मोहीम

**नागपूरः** देशाच्या रस्ते वाहतूक क्षेत्रात काम करणारे "सारथी" हे आपल्या राष्ट्राचे अंतर्गत सैनिक आहेत. लाखो नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन राष्ट्र उभारणीतही महत्त्वाची भूमिका बजावतात."ऑपरेशन सारथी" चे मुख्य उद्दिष्ट म्हणजे सारथींना तणावमुक्त, भयमुक्त आणि सुरक्षित वातावरणात त्यांचे कर्तव्य पार पाडण्यास सक्षम करणे.

सारथी सुरक्षित असतील तरच रस्त्यांवर कमी अपघात होतील आणि देशवासीयांना सुरक्षित राहता येईल. प्रत्येक नागरिकाच्या अस्तित्वाच्या दिशेने हे एक अतिशय महत्त्वाचे पाऊल आहे.मानव यात्रा १३ ऑगस्ट, नागपूर येथून प्रारंभ होऊन गुजरात येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टॅच्यू येथे समाप्त होईल.

# कापूस पिंजण्याच्या मशीनमध्ये हात अडकुन डोक्याचा चेंदामेंदा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

गादी हाऊसमध्ये कामगार म्हणून काम करत असेलल्या कल्पना रुपचंद कामडी (४०) यांचा दुदैवी अंत झाला. धक्कादायक बाब म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून ते कापूस पिंजण्याचे काम करत आहेत. तरीही अनावधानाने झालेली एक चूक त्यांच्यासाठी जीवघेणी ठरली.मोहम्मद शेख रफिक शेख हे नवाब पुरातल्या मस्जिदजवळ भारत गादी हाऊस नावाने दुकान चालवतात. त्यांच्या दुकानात जुनी मंगळवारी भागातील कल्पना रुपचंद कामडी या गेल्या काही वर्षांपासून नियमितपणे कापूस पिंजण्याचे काम करतात.

रविवारी दुपारी २.३० च्या सुमारास कल्पना या नेहमी प्रमाणे कापूस पिंजत होत्या. कापूस पिंजण्याच्या मशीनमध्ये हाताने त्या कापूस भरत असताना बेसावध क्षणी त्यांचा हात मशीमध्ये अडकला. मशीनचा वेग अधिक असल्याने पाहता पाहता काही क्षणात त्यांचा संपूर्ण हात मशीनमध्ये जाऊन केसही आत ओढले गेले. काही कळायच्या आत त्या केसाच्या बाजूने संपूर्णपणे मशीनमध्ये अडकल्या. यात त्यांच्या डोक्याचा चेंदामेंदा झाल्याने कापूस पिंजण्याच्या मशीनमध्ये रक्ताच्या चिरकांड्या उडाल्या. अंगावर शहारे आणणारी ही घटना उघडकीस येताच शेख यांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठत फिर्याद दाखल केली.

# हत्ती हा मानवी भावनांचे दुसरे मोठे प्रारुप
## एलिफंट व्हिस्पर आनंद शिंदे यांचे सत्काराला उत्तर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

2012 साली सर्वात प्रथम केरळ येथे हत्ती बघितल्यानंतर त्याच्याविषयी वाटणारे आकर्षण, निर्माण झालेले प्रेम त्याचे भाव विश्व जाणून घेण्यात परावर्तित झाले. यातूनच हत्तीशी संवाद साधण्याचे अकल्पित कौशल्य निर्माण झाले आणि अभ्यास,संशोधन आणि हत्तीशी संवाद साधताना आलेल्या विविध अनुभवांतून लक्षात आले की राग, प्रेम, खट्याळपणा, खुन्नस भाव या सर्व मानवी भावनांचे हत्ती दुसरे मोठे प्रारूप आहे. असे विधान छायाचित्रकार ते अतिशय संवाद साधण्यात निपुण होण्यापर्यंतचा प्रवास आक्रमित करणारे विश्व प्रसिद्ध आनंद शिंदे यांनी सत्काराला उत्तर देताना केले.

वनराई फाउंडेशन व प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने एलिफंट व्हिस्पर म्हणून विश्वविख्यात असलेले आनंद शिंदे यांच्या छोटेखाणी सत्काराचा कार्यक्रम प्रेस क्लब येथे आयोजित करण्यात आला होता. मंचावर




अध्यक्षस्थानी वनराईचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी, ज्यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला असे माजी मुख्य वनसंरक्षक निशिकांत जाधव, झी टीव्ही ग्लोबल आफ्रिका च्या माजी बिजनेस हेड रत्ना सिरिया व ज्येष्ठ पत्रकार राखी चव्हाण उपस्थित होते.

यावेळी आयोजित विशेष व्याख्यानात आनंद शिंदे यांनी ध्वनिचित्रणाद्वारे हत्तींची संवाद साधताना आलेले विविध अनुभव कथित केले. जे भावविश्व मानवाचे आहे तेच भावविश्व हत्ती या प्राण्याचे असून ते स्वार्थ विरहित आहे. ताडोबा, मध्यप्रदेश, गडचिरोली अशा विविध जंगलात जाऊन त्यांनी हत्तींशी संवाद साधत कधी त्यांचा राग शांत केला तर कधी त्यांच्या डोळ्यातील आसवे पुसली तर कधी त्यांना हसविले.

यावेळी निशिकांत जाधव म्हणाले की मानव आपल्या स्वाथार्साठी जंगल नष्ट करीत आहे यामुळे हत्तींचा अधिवास नष्ट होत असल्याने पुढील पन्नास वर्षात हत्ती प्राणी नामशेष होण्याची भीती निर्माण झाली आहे. कार्यक्रमाचे संचालन शुभदा फडणवीस तर आभार प्रदर्शन निलेश खांडेकर यांनी केले. कार्यक्रमाला अनेक वन्यप्रेमी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी कॉँग्रेस- शरदचंद्र पवार गटाला मोठा धक्का

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार (अल्पसंख्याक विभाग) नागपूर शहर अध्यक्ष रिजवान अंसारी यांनी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते आणि प्रदेश उपाध्यक्ष किशोर कान्हेरे, प्रवक्ते अतुल लोंढे, आमदार अमित देशमुख, हुसेन दलवाई यांच्या उपस्थितीत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये प्रवेश करून एक महत्त्वाचे राजकीय पाऊल उचलले. सक्रिय सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक समुदायातील एक प्रसिद्ध नाव असलेले अंसारी यांनी पक्षाच्या आदर्श आणि तत्त्वांप्रती आपली वचनबद्धता व्यक्त केली.

अंसारी म्हणाले, "सामाजिक न्याय, समानता आणि समावेशक विकासासाठी उभे असलेले व्यासपीठ असलेल्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये सामील होण्याचा मला सन्मान वाटतो. या पक्षाच्या माध्यमातून मी माज्या समुदायाची आणि देशाची सेवा करण्यास उत्सुक आहे." अंसारी यांचा कॉंग्रेसमध्ये प्रवेश होणे ही पक्षासाठी निश्चितच एक महत्त्वाची घटना आहे.

# जीवाची बाजी लावली..१२ गावांचे 'पाणी' वाचवले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

रविवारी दुपारची वेळ. नागपूर जिल्ह्यातील जवळपास 12 ते 14 गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठा केंद्रास वीजपुरवठा करणारी वाहिनी तांत्रिक बिघाडामुळे अचानक बंद पडली. उन्हाळ्याचे दिवस नसले तरी पाणी बंद होण्याच्या भीतीने गावकऱ्यांची घालमेल सुरू झाली. बिघाड दुरुस्त करण्यासाठी महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले, पण बिघाडाची जागा नदीच्या पलीकडे आणि नदी दुथडी भरून वाहत होती. अशा बिकट परिस्थितीत, महावितरणच्या दोन कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांनी कोणताही विचार न करता नदीच्या पाण्यात उडी घेतली आणि टायरच्या सहाय्याने अक्षरशः पोहत पलीकडे जाऊन दुरुस्ती केली. त्यांच्या या धाडसामुळे हजारो घरांचा पाणीपुरवठा सुरळीत झाला.

रविवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास 33 केव्ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठा केंद्रास



वीजपुरवठा करणा-या वाहिनीत अचानक बिघाड झाला. या वाहिनीद्वारे नागपूर शहरालगतच्या गावांना पाणीपुरवठा होतो, त्यामुळे हा बिघाड तातडीने दुरुस्त करणे अत्यावश्यक होते. महावितरणच्या उमरेड उपविभागांतर्गत असलेल्या बेला शाखा कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी तात्काळ पाहणी सुरू केली. त्यांना रामा डॅमजवळ, वेणा नदीच्या पलीकडे, उच्च दाब वाहिनीवर एक 'जीआय गार्डिंग वायर' अडकलेली दिसली. मात्र, नेमका रविवार असल्याने पलीकडे जाण्यासाठी नाव उपलब्ध नव्हती. एका बाजूला गावातील पाणीपुरवठा ठप्प होण्याची भीती, तर दुसऱ्या बाजूला दुथडी भरून वाहणारी नदी.

अशा वेळी, बेला वितरण केंद्राचे दोन कर्तव्यनिष्ठ कर्मचारी तंत्रज्ञ प्रतिक तुरळे आणि बाह्यस्त्रोत कर्मचारी नितीन कावळे यांनी माणुसकी आणि कर्तव्याला प्राधान्य दिले.


गावांची पाण्याची समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कोणताही विचार न करता वेणा नदीच्या थंडगार आणि तुडूंब भरलेल्या पाण्यात उडी घेतली. पोहत पलीकडे गेल्यानंतर या दोन्ही कर्मचाऱ्यांनी अत्यंत धोकादायक परिस्थितीत 33 केव्हीच्या उच्च दाब वाहिनीवरील अडकलेली वायर काढली. त्यांचे अथक परिश्रम आणि अदम्य इच्छाशक्ती यामुळे दुपारी ठीक 3 वाजून 26 मिनिटांनी ही वाहिनी पुन्हा सुरू झाली आणि गावांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत झाला.

यावेळी उपस्थित असलेल्या गावकऱ्यांनी या दोन्ही 'जनमित्रां'चे जोरदार टाळ्या वाजवून अभिनंदन केले. त्यांच्यासाठी हे केवळ दोन कर्मचारी नसून, गावांचे पाणी वाचवणारे देवदूतच होते. महावितरणचे नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता संजय वाकडे, कार्यकारी अभियंता समीर शेंद्रे आणि उपकार्यकारी अभियंता पंकज होनाडे यांनीही प्रतिक तुरळे आणि नितीन कावळे यांच्या धाडसाचे कौतुक केले आहे. या घटनेने हे पुन्हा एकदा सिद्ध झाले की, महावितरणचे कर्मचारी केवळ आपले काम करत नाहीत, तर प्रसंगी आपल्या जीवाची बाजी लावून समाजासाठी एक आदर्श उभे करतात.

# काटोल तालुक्यात खरीप पिकांवर हुमणी अळीचे थैमान

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ११ :





अहो, पिकाला पाणी-पिकवणं सगळं केलं, पण रातोरात झाडं पिवळी पडली, मुळं उपटली गेल्यासारखी हलकी झाली, असं डोळ्यात पाणी आणत ढवलापूरच्या एका शेतकऱ्याने सांगितलं. काटोल तालुक्यात खरीप हंगाम सुरू होताच हुमणी अळीने शेतकऱ्यांच्या स्वप्नांवर कुरघोडी केली आहे. जमिनीत लपून बसणारी ही अळी, पिकांच्या मुळांवर चावून ती अक्षरशः उध्वस्त करते.

सोयाबीन, शेंगदाणा, कापूस, तूर यापासून आता संत्रा-मोशांबीच्या बागांनाही याचा फटका बसत आहे. ढवळापूर, कोहळा, लिंगा, आजनगाव, सावळी, पारडी गोतमारे, मेटपांजरा, ताराबोली, डोंगरगाव हातळा, मेंढेपठार, कुकडी पांजरा, रिधोरा वाडोणा, कारळा, सालई, गोन्ही, मेंडकी, पठार, गगालडोह, खानगाव अशा २० पेक्षा जास्त गावांमध्ये शेतकरी त्रस्त झाले आहेत. हवामान-शेतीचं नातं आणि हुमणीची मेवा मिळवणारी माती,उष्ण हवामान, हलकी किंवा रेतीसर-दोमट माती हा हुमणीच्या राहणीमानाचा स्वर्गच! त्यात सतत एकाच शेतात तेच पीक घेण्याची पद्धत, पिकांमधील विविधतेचा अभाव हे सारे मिळून या कीटकाला राजमार्ग देतात, असं कृषी तज्ञांचं स्पष्ट मत आहे.

**प्रादुर्भावाची लक्षणं:**

पानं पिवळी पडणं आणि झाडं कोमेजणं मुळं सैल होणं, सहज उपटली जाणं झाडं पडझड होणं शेवटी संपूर्ण पीक नष्ट होणं

**उपाय आणि बचावाचे मार्ग:**

खोल नांगरट करून माती उलटवून अंडी-अळ्या उन्हात नष्ट करणं पीक फेरपालट (फसल चक्र) राबवणं शेतातील पिकांचे अवशेष काढून टाकणं लाईट ट्रॅप लावून प्रौढ कीटक नष्ट करणं नीम तेल, मेटारायझियम, बवेरिया सारखे जैविक कवक वापरणं आवश्यकता असल्यास कार्बोफ्युरॉन किंवा फोरेटसारखी रासायनिक औषधं वापरणं, मात्र पर्यावरण व आरोग्याचा विचार करून आमचं पीक गेलं, आता कुटुंब उपाशी राहील. म्हणून तातडीने मदत द्या आणि कीटकनियंत्रण मोहीम राबवा, अशी मागणी मेटपांजरा ग्राम पंचायतचे सरपंच अनिल नेहारे, कचारी सावंगा सरपंच -रवी जयस्वाल, प्रकाश बारंगे, पदम पाटील डेहनकर, राहूल डोंगरे, राजु किनेकर, नरेश नागपूरे, कोहळाचे सरपंच प्रमोद ठाकरे यांनी तसेच कोंढाळी, मासोद मेटपांजरा,येनवा, पारडसिंगा, या भागातील शेतकर्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# देशी दारुची वाहतुक करणारा पोलिसांच्या जाळयात

## आरोपीला अटक, वाहनासह ८५,०४० रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ११ :




कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाने सिहोरा मार्गावर अवैधरित्या देशी दारुची वाहतुक करणाऱ्याला पकडुन त्याचा जवळुन दुचाकी वाहना सह एकुण ८५,०४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल केला आहे.

सोमवार (दि.११) ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० वाजताच्या दरम्यान पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात डीबी पथक अवैध धंध्यावर कारवाई करणे कामी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त माहिती मिळाली कि कन्हान कडुन सिहोरा कडे इलेक्ट्रीक ओला मोपेड दुचाकी वाहनाने एक युवक अवैधरित्या देशी दारुची वाहतुक करीत आहे.

पोलीसांनी सिहोरा रोडावर नाकाबंदी केली असता कन्हान कडुन मोपेड दुचाकी वाहन क्रमांक एम एच ४० सीव्ही ३०१२ सिहोरा कडे जातांना दिसुन आली. वाहनाला थांबवुन पोलीसांनी आरोपी धर्मेंद्र अरविंद श्रोते (३०) रा.कन्हान यास ताब्यात घेऊन वाहनाची पाहणी केली असता कपड्याचा थैलीत ७० देशी भिंगरी निपा मिळुन आले. पोलीसांनी घटनास्थळ जप्त पंचनाम्याची कारवाई करुन देशी दारु निपा किंमत ५,०४० रुपए आणि मोपेड दुचाकी वाहन किंमत ८०,००० रुपए असा एकुण ८५,०४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी कन्हान पोलीसांनी आरोपी धर्मेंद्र श्रोते याचा विरुद्ध गुन्हा दाखल करुन पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

# झाडांना बांधली मायेची राखी

■ महासागर प्रतिनिधी
बेला, दि. ११ :



जवळच्या कळमना (बेला) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून वृक्ष लागवड व संवर्धनाचा दृढ संकल्प केला. मुख्याध्यापिका मीरा ज्ञानोबा मुसळे नागरगोजे यांच्या प्रेरणेतून हा अभिनव उपकम शाळेत राबविण्यात आला. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

"झाडे आपले हिरवे सोबती ' त्यांच्याशिवाय जीवन अशक्य" - हा संदेश उराशी बाळगत विद्यार्थ्यांनी फक्त एकमेकांच्या हातावरच राखी बांधली नाही, तर शाळेच्या आवारातील हिरव्या-गर्द झाडांनाही प्रेमाने राखी बांधून त्यांचे रक्षण करण्याची शपथ घेतली. लहानग्या हातांनी झाडांना पाणी घालून, तुम्ही आमचे खरे भाऊ आहात असा जिव्हाळ्याचा संदेश चिमुकल्यांनी निसर्गाला दिला. मुख्याध्यापिका मुसळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक शिक्षिका रूपाली दिलीप शेंडे व निशिता मनोज वाकडे यांनी विद्यार्थ्यांना निसर्ग आणि मानव यांचे नाते समजावून सांगत झाडांवर जीवापाड प्रेम करण्याचे महत्त्व पटवून दिले. शाळा स्थापन समितीचे अध्यक्ष दिनकर राऊत उपाध्यक्ष किशोर शहाणे तसेच सदस्य, सदस्या, पालक, शिक्षकवर्ग व ग्रामस्थांनी हा अनोखा उपक्रम पाहून विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

## आरपीएफ नागपूर मंडळाच्या सतर्कतेमुळे दोन अल्पवयीन मुले वाचली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

नागपूर मंडळातील रेल्वे संरक्षण दलाने (आरपीएफ) प्रवाशांच्या, विशेषतः मुलांच्या सुरक्षिततेसाठी आपली बांधिलकी पुन्हा सिद्ध करत दोन स्वतंत्र प्रकरणांत अल्पवयीन मुलांना तत्परतेने सुरक्षित वाचवले.

पहिल्या प्रकरणात, नागपूर मंडळ सुरक्षा नियंत्रण कक्षास माहिती मिळाली की गाडी क्रमांक 19344 पंचवटी एक्सप्रेसमध्ये एक अल्पवयीन मुलगी एकटी प्रवास करत आहे. तात्काळ कार्यवाही करत, आरपीएफ आमला पोस्ट पथकाने ठरलेल्या स्थानकावर मुलीला सुरक्षित उतरवून चौकशी केली. चौकशीत समजले की ती कौटुंबिक कारणास्तव एकटी प्रवास करत आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून तिला वन स्टॉप सेंटर, बैतूल येथे बालसंरक्षण अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सुरक्षित सुपूर्द करण्यात आले.

दुसऱ्या प्रकरणात, अजनी रेल्वे यार्डात उभ्या असलेल्या गाडी क्रमांक 12119 इंटरसिटी एक्सप्रेसच्या रिकाम्या रॅकला लॉक करताना रेल्वे कर्मचाऱ्यांनी एका कोचमध्ये झोपलेला अल्पवयीन मुलगा पाहिला. त्याला जागे केल्यानंतर समजले की तो घरीून भटकत चुकीच्या गाडीत चढला आणि नागपूरला आला. कुटुंबीयांशी संपर्क होऊ न शकल्यामुळे आरपीएफ अजनी पोस्टने त्याची देखभाल केली.

## नागपूर जिल्हा परिषदेत कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पदावर दहा वर्षापासून पदोन्नती थांबली

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

नागपूर जिल्हा परिषदेतील कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी (वर्ग ३, श्रेणी ३ ) या पदाबाबत कोणतेही व्यापग (रद्द) करण्याचे परिपत्रक किंवा शासन निर्णय नसतानाही, गेल्या दहा वर्षांपासून या पदावर पदोन्नती दिली जात नाही. शासनाकडून अशा प्रकारचा कोणताही आदेश नसतानाही, जिल्हा परिषदेत केवळ ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी (वर्ग ३, श्रेणी २) या पदावरच पदोन्नती अथवा विभागीय परीक्षा मार्फत भरती केली जात आहे. शिक्षण विभागातील या कारभारामुळे कनिष्ठ पदावर जाणारे अधिकारी व कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहिले आहेत. या संदर्भात महाराष्ट्र राज्य पदवीधर, प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटना, जिल्हा नागपूरचे केंद्रप्रमुख व राज्य प्रतिनिधी भूपेश चव्हाण यांनी म्हटले की, गेल्या १०-१२ वर्षांपासून अनेक कर्मचाऱ्यांची पदोन्नती होणे अपेक्षित होते, मात्र ती न मिळाल्यामुळे त्यांच्या हक्कांवर गदा आली आहे.

## नरखेड स्टेशनवर आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग व मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. निर्मला गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली नरखेड रेल्वे स्थानकावर व्यापक आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले. या शिबिराचा उद्देश कर्मचारी, निवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्य जागृती व प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्रोत्साहन देणे हा होता.

शिबिरात उंची, वजन, बॉडी मास इंडेक्स (इटक), दृष्टी, रँडम ब्लड शुगर व रक्तदाब तपासण्यात आला. सर्व लाभार्थ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी करून मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. क्षयरोग, उच्च रक्तदाब, मधुमेह, साप चावण्याची प्रतिबंधक उपाययोजना, अपस्मार, डेंग्यू व उत्तम आरोग्यासाठी जीवनशैली सुधारणा या विषयांवर विशेष जनजागृती सत्र घेण्यात आले. डॉ. सुमित गोजे यांनी कर्मचाऱ्यांना प्राथमिक उपचार व कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन (सीपीआर) यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. एकूण 82 लाभार्थ्यांनी या शिबिरातील सुविधा व मार्गदर्शनाचा लाभ घेतला. ही पुढाकार नागपूर विभागाच्या कर्मचारी कल्याण, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा व निरोगी रेल्वे कर्मचारी वर्ग निर्मितीच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.

## चाकूसह दोघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ११ :

गुन्हे शाखा युनिट ३ आणि प्रतापनगर पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारावर घातपाताच्या तयारीत असलेल्या दोन गुन्हेगारांना अटक केली. त्यांच्याकडून शस्त्रही जप्त केले. आकाश विलास लांजेवार (३०) रा. शास्त्रीनगर, नंदनवन आणि विशाल उर्फ बॉबी भागवत शिंदे (३०) रा. कामगार कॉलनी, सुभाषनगर अशी अटकेतील गुन्हेगारांची नावे आहेत. पहिल्या घटनेत गुन्हे शाखा युनिट ३ चे पथक रात्री ११.३० वाजताच्या सुमारास लकडगंज ठाण्यांतर्गत गंगा-जमुना परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान एक तरुण एमएच-४९/सीसी-९२४५ क्रमांकाच्या मोटारसायकलने संशयितरित्या जाताना दिसला. त्याला थांबवून विचारपूस केली असता तो घाबरला. संशयाच्या आधारावर पोलिसांनी वाहनासह त्याची झडती घेतली असता डिक्कीत एक चाकू मिळाला. त्याला अटक करून अभिलेख तपासला असता त्याच्यावर गुन्ह्यांची नोंद असल्याची माहिती पुढे आली. तो चाकू घेऊन परिसरात काय करत याचा तपास लकडगंज पोलिस करीत आहेत.

### छत्रपती शिवाजी महाराज चबुतऱ्यावरील नेमप्लेटची तोडफोड करणाऱ्यावर

# भाजपच्यावतिने कारवाईची मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
भिवापूर, दि. ११ :



आझाद चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाच्या खाली असलेल्या नावाच्या पाटीची काही समाजकंटकांनी कुऱ्हाड व लोखंडी सलाखीने दि. 8ऑगस्ट रोजी तोडफोड केली होती त्यामुळे शहरात एकच खळबळ माजली होती. याबाबत आज दि. 11 ऑगस्टला सकाळी 11 वाजता भाजपा शहरच्या वतीने ठाणेदार भिवापूर जयप्रकाश निर्मल यांच्या मार्फत नागपूर ग्रामीण पोलिस अधिक्षक यांना भाजपा शहर अध्यक्ष अनिल समर्थ यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात येवून सदरचे घृणास्पद कृत्य करणाऱ्या आरोपी विरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य प्रतिमा दोन वर्षापूर्वी तत्कालीन आमदार राजु पारवे यांच्या निधीतून तयार करण्यात आली होती.

सदरचे प्रकरण 8 ऑगष्टला सकाळी 5 वाजता काही जणांना दिसल्याने हे प्रकरण उघडकीस आले. या घटनेमुळे नागरीकांत संताप व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

निवेदन देतेवेळी भाजपा शहराध्यक्ष अनिल समर्थ, माजी शहराध्यक्ष आनंद गुप्ता, भाजपा जिल्हा महामंत्री हिमांशू अग्रवाल, महामंत्री जावेद कुरेशी, अनिल निखारे धनंजय चौधरी, वैशाली पेदाम, सुचिना लोनगाडगे, शाहुल ढोणे, रमेश नक्षीणे, रमेश भनभुजे रमेश नागपुरे, हंसराज जनबंधू, अकुंश शंभरकर, युवराज करनुके उपस्थित होते.

## आदिवासी दिनानिमित्त बाईक रॅलीचे आयोजन

**नागपूर :** क्रांतिदिनी 9 ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनानिमित्त अ. भा. युवा विकास परिषद, हिंगणा तालुक्यातर्फे वर्धा मार्गावरील डोंगरगाव ते गोंड राजे बख्त बुलंद शहा चौक, नागपूरपर्यंत भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला जामठाचे सरपंच योगेश टेकाम, अ. भा. आदिवासी युवा विकास परिषद हिंगणा तालुका अध्यक्ष मिलिंद कोवे, समाजसेवक शरद सराटे, बंडू चिवंडे, रंगाभाऊ परतेकी उपस्थित होते. बाईक रॅलीच्या आयोजनासाठी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनोद मसराम, विदर्भ अध्यक्ष संतोष आत्राम, गणेश ग्वालबन्सी, दर्शन कुलसंगे, सौरभ मसराम, चंदू मरसकोल्हे, मंगेश मरसकोल्हे, शिवाजी मरसकोल्हे, अरविंद कोवे व आदिवासीबांधव उपस्थित होते.

## शेलोकर यांचा वाढदिवस साजरा



■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ११ :

शहरातील सामाजीक कार्यकर्ते पुरूषोत्तम शेलोकर यांचा वाढदिवस त्यांच्या निवासस्थानी आनंददायी वातावरणात चाहत्यांनी जावुन साजरा करत त्यांना पुढील वाटचाली व प्रगती बाबत शुभेच्छा दिल्या. महिला कॉंग्रेस नेत्या कुसुम खोब्रागडे यांनी केक कापुन कार्यक्रमाला सुरुवात केली. पुरूषोत्तम भाऊ हें नेहमीच मदत करणारे म्हणुन त्यांची ओळख आहे. या कार्यक्रमात कॉंग्रेस नेते आनंद खोब्रागडे, मनोहर खूरगे, बाल्या बोरीकर, विष्णूजी चनोले, राजकुमार गेडाम, प्रकाश लाईनपाद, सोनु, अनमोल डोंगरे आणि त्यांच्या मातोश्री व सहकारी होते.

# मांडवघोराड येथे वीज वितरणकडून सोलर विषयक जनजागृती

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ११ :



तालुक्यातील मांडवघोराड येथे विज वितरण कंपनी कडून घरगुती सोलर लावण्यासाठी जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. विज वितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता सुनील पिसे, लाईनमन ईश्वर डोपाचे, प्रवीण सिंदूरकर यांनी सोलार युनिट लावण्याची प्रक्रिया, कागदपत्रे व शासकीय अनुदान याविषयी माहिती देण्यात आली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य मारोती हजारे, सरपंच भारती दडमल, उपसरपंच दीपक अडबैले, सचिव अंकलेश सोरते ,ग्राम पंचायत सदस्य प्रशांत रंदई, नागरिक सुनील निघोट, देवराव बेलेकर ,योगेश येरकुडे ,विलास दडमल, रामदास पांडे, नामदेव रंदई, नामदेव दडमल, उत्तम जीवतोडे, नामदेव उईके, अशोक चाफले, महेंद्र देशमुख, रामदास शेंडे, मुकुंद चौखे, सुरज दांडेकर,चेतन रोकडे,ओमप्रकाश वरठी आदी उपस्थित होते.

# रक्षाबंधन म्हणजे बंधुत्वाच्या धाग्यात महिला भगिनींचा सन्मान : स्नेहल राऊत

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. ११ :



रक्षाबंधन हा आपल्या भारतीय संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे, जो केवळ बंधुत्वाच्या नात्याला साजरा करत नाही, तर प्रेम, विश्वास, आणि संरक्षणाची भावना जागृत करतो. आज अनेक महिला बहिणींनी मला राखी बांधली. या महिला भगिनींच्या संरक्षणाचे आमचे कर्तव्य आहे. त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी आपले प्रयत्न असणार आहेत. आजचा हा कार्यक्रम म्हणजे बंधुत्वाच्या धाग्यात महिला भगिनींचा सन्मान असल्याचे प्रतिपादन अरोली येथील सहायक पोलिस निरीक्षक स्नेहल राऊत यांनी केले.

तालुक्यातील अरोली पोलिस स्टेशन येथे भाजपा महिला आघाडीच्या वतीने शेकडो महिला बहिणींनी एकत्र येत येथील 24 तास सेवा देणाऱ्या पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. या प्रसंगी भावना व्यक्त करताना ते बोलत होते. 'भगिनीला सन्मानाने वागवावे, तिच्या हक्कांचे रक्षण करावे, आणि तिच्या विकासासाठी आपले योगदान द्यावे, हे आपले कर्तव्य आहे. यात अनेक महिला व दिव्यांग महिलांच्या संघर्षाची कहाणी प्रत्येकासाठी प्रेरणादायक आहे. त्यांना जीवनात येणाऱ्या अडचणींवर मात करावी लागते, परंतु त्यांनी आपल्या मनाची आणि शरीराची ताकद दाखवून आपल्या ध्येयांच्या दिशेने यशस्वीपणे वाटचाल केली आहे. त्यांचे साहस, आत्मविश्वास, आणि अडचणींवर मात करण्याची इच्छाशक्ती ही उर्जा देणारी आहे. आपण एकमेकांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, एकमेकांचे रक्षण केले पाहिजे, आणि एकमेकांप्रती प्रेम, आदर आणि समर्पणाची भावना ठेवली पाहिजे, हे आजचा सण आपल्याला आठवण करून देतो. असेही त्यांनी बोलतांना म्हटले.

यात उपस्थित म्हणून भाजपा तालुका अध्यक्ष मुकेश अग्रवाल, सहायक पोलिस निरीक्षक स्नेहल राऊत, पोलिस उपनिरीक्षक सुशील सोनावणे, अरोली येथील सरपंच रोशनी भुरे, भगवान बावनकुळे, गोपाल गिरमेकर, विष्णु देशमुख, रोशन उमप, विशाल सेलोकर, रेवानंद देशमुख, अनिल पडोळे, मंगला देशमुख, मंदा राखडे, गायत्री बादुले , चंदा गेडाम, उषा मोहतुरे , सुनीता थोटे, ललिता मरस्कोल्हे, बेबीनंदा गजभिये, परबता परतेती, दीपाली अनिल पडोळे, गायत्री थोटे, निता लांजेवार, कमलेश बादूले, अतुल राखडे. गौरव बावनकुळे उपस्थित होते.

# झोपडपट्टीधारकांची मालमत्ता कराची थकीत दंडाची रक्कम होणार माफ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील वन विभाग वगळून महाराष्ट्र शासनाच्या, निमशासकीय, खाजगी मालकीच्या, मालकीच्या जागेवरील नागपूर महानगरपालिका मालकीच्या जागेवरील झोपडपट्टीतील झोपडपट्टीधारकांना नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या, खाजगी मालकीच्या जागेतील अधिसूचित झोपडपट्टीतील सर्वांसाठी घरे योजनेच्या लाभ मिळण्याकरीता झोपडपट्टी धारकांच्या भाडेपट्टे असलेल्या मालमत्ता कर रक्कमेवरील शास्ती रक्कम 100 टक्के माफ करण्यात येत आहे. झोपडपट्टीतील थकित मालमत्ता करावरील दंड पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय नागपूर महानगरपालिकेने घेतला आहे. या निर्णयाचा फायदा शहरातील झोपडपट्टीतील लाखो रहिवाशांना होणार आहे. ही योजना १ ऑगस्ट २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत लागू राहणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी झोपडपट्टीधारकांना थकीत मालमत्ता कराचा भरणा करावा लागणार आहे. असे आदेश मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी निर्गमित केले आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात नागपूर महानगरपालिकेतर्फे "सर्वांसाठी घरे-२०२२" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. याकरीता मनपाच्या मालकीच्या जागेवरील, नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय विभागाच्या मालकीच्या (वन विभाग वगळून) नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमित झोपडपट्ट्यातील अतिक्रमणे नियमित करण्यात येत आहे. अशा नियमित झालेल्या झोपडपट्टीधारकांना भाडेपट्टा देण्याकरीता अशा जागेवरील जागा/झोपडी/ घर करीता थकीत असलेल्या मालमत्ता करावरील आकारलेला दंड माफ करण्याकरीता मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशनानुसार अभय योजना-२०२५ जाहीर केली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांना याचा लाभ घेण्याचे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

"सर्वांसाठी घरे-२०२२" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणे हेतू महाराष्ट्र सरकारने शासन निर्णय काढले आहे. विविध शासन निर्णयानुसार 1 जानेवारी 2011 किंवा त्यापूर्वी निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण करण्यात आलेले भुखंड नियमानुकूल करण्यास पात्र आहेत.

थकीत मालमत्ता कर रकमेवर लागलेली शास्ती रक्कम माफ करण्याबाबत अधिकार मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांना आहेत. अभय योजना लागू असलेल्या काळात अतिक्रमित असलेल्या झोपडपट्ट्यातील करकरदात्यांकडून नागपूर महानगरपालिकेस घेणे असलेल्या मूळ रक्कमेचे १०० टक्के अधिदान केल्यास थकीत रक्कमेवर प्रतिमाह २ टक्के आकारण्यात आलेला दंड, जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क व वसुलीचा खर्च पूर्णतः माफ करण्यात येईल. ही योजना सुरू होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी या योजनेअंतर्गत मागणी किंवा दावा करता येणार नसल्याचे या आदेशात स्पष्ट केले आहे.

या अधिकारानुसार अतिक्रमित झोपडपट्ट्यातील अतिक्रमणधारकांनी / झोपडीधारकांनी निव्वळ मालमत्ता कराची रक्कम भरण्याकरीता, मालमत्ता करावर लागलेली शास्ती/दंड माफीची अभय योजना-२०२५ राबविण्याचा मनपाच्या कर निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती उपायुक्त मिलिंद मेश्राम यांनी दिली. सदहू अटीची पूर्तता होणेकरीता जागेवरील अतिक्रमण धारकांकडून अद्यावत मालमत्ता कर रसीद हे एक दस्ताऐवज महत्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक झोपडीधारकाने मालमत्ता कर महानगरपालिका निधीत जमा करुन अद्यावत मालमत्ता कर रसीद प्राप्त करून घ्यावी तसेच भाडेपट्टा मिळण्याकरीता असलेल्या अटी ची पूर्तता झोपडीधारकांना करावी लागणार आहे.

# श्री विश्वनाथ बाबा हायस्कूलमध्ये बॅग व वह्यांचे वितरण

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. ११ :**



येथील श्री विश्वनाथ बाबा हायस्कूलमध्ये इयत्ता ८ वी ते १० वीतील सर्व विद्यार्थ्यांना वह्यांचे, तर गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे विनामूल्य वितरण प्रयास ग्रीन सिटी सामाजिक संस्थाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्यामकुमार जयस्वाल, मुख्य कार्यकारी अधिकारी जुगलकिशोर जयस्वाल, प्राचार्य राजेश बिडवाईक, प्रयास ग्रीन सिटी सामाजिक संस्थेचे पदाधिकारी विनोद कोचर, राजेंद्र सोनी, भरत मेहता, जगदीश सोनी, आनंद कोचर, अशोक सावरकर, कमल अग्रवाल, गुणवंत पटेल, वसंत पांचाळ, अशोक बंब , सायबर क्राईम ब्रांच, नागपूरच्या अधिकारी श्रद्धा ढोमणे उपस्थित होते. यावेळी जुगलकिशोर जयस्वाल, प्राचार्य राजेश बिडवाईक आणि अधिकारी श्रद्धा ढोमणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन संदीप उपासे यांनी तर आभार विजया बोरकुटे यांनी मानले. यावेळी शिक्षिका इंदिरा मोहतकर, चव्हाण, विजया बोरकुटे, आखरे, खुशी गणवीर, किर्ती चौके, शिक्षक जयकिशोर जैस्वाल, सतीश जैस्वाल, विजय जैस्वाल सर,उमेश दडमल, स्वप्नील जैस्वाल, अशोक जांभळे, विवेक चौधरी, प्रा. अशोक डोंगरकर, प्रा. सुधाकर लडके, प्रा. बलदेव राठोड, दिलीप तळहांडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जीवन मुंगळे मित्र परिवार सेवा प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप



■ महासागर प्रतिनिधी
**कन्हान, दि. ११ :**

टेकाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जीवन मुंगले मित्र परिवार सेवा प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना आज (ता ८) ला रक्षाबंधन या पवित्र पर्वाच्या शुभ मुहूर्तावर शालेय साहित्याचे वितरण या प्रतिष्ठानचे प्रवर्तक जीवन मुंगले यांच्या वतीने त्यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी भाजप नेते व रामटेक जिल्हा उपाध्यक्ष संजय मुलमुले तर प्रमुख पाहुणे म्हणुन मुंगले प्रतिष्ठानचे संस्थापक, जीवन मुंगले, पत्रकार किशोर वासाडे, शाळेच्या शिक्षिका जयश्री चवरे, कन्हान मंडल भाजप अध्यक्ष बिरेंद सिंग, टेकाडी गावाचे सरपंच विनोद इनवते, उपसरपंच जितेंद्र चव्हाण उपस्थित होते.

यावेळी मंचावर नरेश मेश्राम पं स. सदस्य, अविनाश कांबळे, सुरेंद्र बुधे, लाखेश्वर वासाडे, विलास हूड, टेकाडी ग्रा.स. कुणाल वासाडे, कन्हान नगरपरिषद पदाधिकारी राजेंद्र शेंद्रे,मनोज कुरडकर, सुषमा चोपकर, अनिता पाटील, संगीता खोब्रागडे शैलेश शेळके, व सेवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते.

आपले प्रास्तविक व मनोगत व्यक्त करतांना जीवन मुंगले यांनी सांगितलं की माणूस ज्या समाजात जन्माला येतो त्या समाजा प्रति त्यांचे कर्तव्य, एक सामाजिक बांधिलकी, सामाजिक जबाबदारी, सामाजिक ऋण असतें असलेले हे सामाजिक ऋण फेडण्यासाठी, जबाबदारी पुर्ण करण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊन गरीब व गरजवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व निरंतर शिक्षणाचा प्रवास सुरू राहण्यासाठी या सेवा प्रतिष्ठान तर्फे शैक्षणिक मदत करण्यात येत असल्याचे या सेवा प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष व भाजप लोकसभा विस्तारक जीवन मुंगले यांनी सांगितले.

यावेळी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात पुढे केल्याबद्दल किशोर वासाडे यांनी प्रतिष्ठानचे धन्यवाद व्यक्त केले. प्राथमिक विभागाच्या गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे अंतर्गत स्कूल बॅग, बूट, कंपास वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जीवन मुंगले यांनी तर संचालन नीलकंठ मस्के यांनी केले. उपस्थितांचे आभार पत्रकार किशोर वासाडे व शिक्षिका जयश्री चवरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विलास हूड, मंगेश काठोके, विशाल सातपैसे, विलास सावरकर यांनी सहकार्य केले.

# हुतात्मा स्मारक येथे क्रांती दिवस संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
**कामठी, दि. ११ :**



येथिल शहीद स्मारक येथील प्रांगणात ९ ऑगस्ट हा क्रांती दिवस म्हणुन साजरा केला. हा क्रांती दिवस स्वातंत्र्या लढ्यातील एक महत्वाचा दिवस आहे. १९४२ ला याच दिवशी महात्मा गांधींनी भारत छोडो आंदोलनाला सुरुवात केली. या लढयात ब्रिटीश राजवटी विरूद्ध निर्णायक लढा दिला गेला. या दिवसाची व शहीद झालेल्या हुतात्म्यां चे आठवण करून श्रद्धांजली दिली जाते.

कामठी नगर परिषद मुख्याधिकारी विनोद जाधव आणि मुख्याधिकारी दिपक घोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत क्रांती दिनाचे कार्यक्रम घेण्यात आले. स्वातंत्र्य लढयात बलीदान दिलेल्या सर्व हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली.

यावेळेस उपमुख्याधिकारी रत्नमाला फटिंग, प्रशासकीय अधिकारी महेश चौबे, सुशांत जगताप, कन्हान नगर परिषदचे मुख्याधिकारी दीपक घोडके आणि कामठी नगर परिषद मुख्याधिकारी विनोद जाधव यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला तसेच येथील दिवंगत राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या पूणार्कृती पुतळ्याला माल्यार्पण केले. याप्रसंगी सर्वश्री चेतन तुरस्कर, प्रदीप भोकरे, रुपेश जैस्वाल, धर्मेश जैस्वाल, माधुरी घोडेस्वार, अश्विनी पिल्लारे, जमील अहमद, रंजीत माटे, दिपक जैस्वाल, संतोष मिश्रा, ढोके, सुभाष भानारकर, दर्शन गोंडाने सहित कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थीत होते. संचालन कौशल्या शर्मा यांनी केले.

# स्वातंत्र्यदिन परेडसाठी जयश्री इंगोले यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. ११ :**



खसाळा ग्रामपंचायतीच्या सरपंच जयश्री धनंजय इंगोले यांची ग्रामविकास विभागामार्फत १५ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या स्वातंत्र्यदिन परेड समारंभासाठी विशेष निमंत्रित म्हणून निवड झाली आहे.


ग्रामविकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना हा मान मिळाला आहे. राज्यातील निवडक सरपंचांमध्ये त्यांचा समावेश होणे ही खसाळा ग्रामपंचायतीसह संपूर्ण नागपूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. जलसंवर्धन, हिरवळ, महिला सक्षमीकरण, घनकचरा व्यवस्थापन, वाचनालय, स्मृतिउद्यान यांसारख्या विकासकामांची दखल घेऊन हा मान मिळाला. राष्ट्रपती भवन व पंतप्रधान कार्यालयातील मान्यवरांच्या उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाल्याने खसाळा परिसरात अभिमानाचे वातावरण आहे.

# एमडी विक्रेत्याच्या घरावर धाड

**नागपूर :** जुनी कामठी पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर एका एमडी विक्रेत्याच्या घरावर धाड टाकली. झडतीमध्ये त्याच्याजवळ ११ किलो २२० ग्रॅम एमडी पावडर मिळाले. पोलिसांनी एमडी जप्त करून आरोपीला अटक केली. मोहम्मद शाहबाज उर्फ सोनू मोहम्मद हफीज (३३) रा. तुमडीपुरा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. शाहबाज हा अनेक वर्षांपासून एमडी विक्रीत सक्रीय आहे. तो घरूच एमडीची विक्री करतो. शनिवारी रात्री ९.१५ वाजताच्या सुमारास शाहबाजने मोठ्या प्रमाणात एमडी विक्रीसाठी आणून ठेवला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी परिसराची घेराबंदी करून शाहबाजच्या घरावर धाड टाकली. त्याला ताब्यात घेऊन घराची झडती घेतली असता १५ हजार ८०० रुपये किंमतीचा माल मिळाला. पोलिसांनी आरोपीकडून एमडीसह दोन मोबाईल, वजन काटा आणि रोख २५ हजार असा एकूण ९० हजार ६८० रुपये किंमतीचा माल जप्त केला.

# कचेवणी-तिरोडा दरम्यानचा लेव्हल क्रॉसिंग गेट १८ ऑगस्ट पासून बंद

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ११ :**



रस्ते वाहतुकीसाठी नवीन बांधलेला रोड ओव्हर ब्रिज उपलब्ध आग्नेय मध्य रेल्वेचे उद्दिष्ट प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि आरामदायी प्रवास अनुभव प्रदान करणे आहे. आणि रस्ते वाहतूक आणि रेल्वे सेवा जलद आणि त्रासमुक्त करण्यासाठी हे त्यांच्या प्राधान्यक्रमात समाविष्ट आहे. या दिशेने, सुरक्षितता लक्षात घेऊन, नागपूर विभाग टप्प्याटप्प्याने सर्व लेव्हल क्रॉसिंग बंद करेल आणि त्या जागी अंडरपास किंवा रोड ओव्हर ब्रिज बांधण्यात येत आहे. या क्रमाने, जिल्हाधिकारी गोंदिया यांची संमती आणि सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता मिळाल्यानंतर १००० किमी नंतर, मानवयुक्त लेव्हल क्रॉसिंग गेट क्रमांक ५२० (किमी). ११२८/०३--०५) १८ ऑगस्ट २०२५ पासून कायमचे बंद केले जात आहे. नवीन बांधलेला रोड ओव्हर ब्रिज बांधण्यात आला आहे आणि १८ ऑगस्ट २०२५ पासून तो सर्व वाहतुकीसाठी खुला असेल. त्या याद्वारे चालवल्या जातील. या बदलामुळे रस्ते आणि रेल्वे दोन्ही ठिकाणी अधिक वाहतूक होईल. सुरक्षा, सुविधा आणि सातत्य सुनिश्चित केले जाईल.

# सहा परमवीरांच्या जन्मभूमीची वीर माती ऑरेंज सिटीमध्ये येईल

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ११ :**



देशात ओळख मिळवणाऱ्या ऑरेंज सिटी नागपूरमध्ये, बेतियान शक्ती फाउंडेशन लोकांच्या मदतीने २१ परमवीर चक्र पुरस्कार विजेत्यांसाठी भारतातील पहिले अद्वितीय परमवीर स्थळ बांधत आहे. येत्या स्वातंत्र्यदिनी, संस्था दुसऱ्या टप्प्यात सहा परमवीर चक्र पुरस्कार विजेत्यांच्या जन्मस्थळाची माती नागपुरात आणत आहे.

देशाच्या हितासाठी आपले जीवन समर्पित करून, भारतभूमीच्या रक्षणासाठी अतुलनीय शौर्य दाखवून देशाचा सर्वोच्च शौर्य पदक परमवीर चक्र प्राप्त करणाऱ्या सर्व वीरांच्या शौयार्ची गाथा संपूर्ण देशवासीयांना परिचित करून देण्यासाठी आणि ज्या मातीत योद्ध्यांनी आपले पाय स्पर्श केले आहेत त्या मातीला आदरांजली वाहण्यासाठी आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, बेटियान शक्ती फाउंडेशन नागपूर नागपुरात एक भव्य परमवीर स्थळ बांधणार आहे.

२६ जानेवारी २०२४ रोजी राजस्थानमधील परमवीर चक्र पिरू सिंग शेखावत यांच्या जन्मस्थळावरून वीर माती आणून या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. येत्या १४ ऑगस्ट रोजी पंजाबचे शहीद सुभेदार जोगिंदर सिंग, शहीद फ्लाइंग ऑफिसर निर्मलजीत सिंग सेखो, लान्स नाईक करम सिंग, हरियाणाचे मेजर होशियार सिंग दहिया, उत्तर प्रदेशचे शहीद नाईक जादू सिंग, शहीद कॅप्टन मनोज पांडे यांच्या जन्मस्थळावरील वीर माती १५ ऑगस्ट रोजी पहाटे भारतीय सैन्याच्या सीताबर्डी किल्ल्यावरील हरि पूजा भवनात, उत्तर महाराष्ट्र आणि गुजरात उप-प्रदेशात विधिवत अंत्यसंस्कार केले जातील.

१५ ऑगस्ट रोजी सकाळी सीताबर्डी किल्ल्यापासून बेतियान शक्ती फाउंडेशन खरबीपर्यंत तिरंगा सायकल रॅली काढण्यात येईल आणि परमवीर चक्र स्थळ काम पूर्ण होईपर्यंत संस्थेच्या कार्यालयात सुरक्षित ठेवण्यात येईल आणि नागरिकांना पाहण्यासाठी ठेवण्यात येईल, अशी माहिती बेतियान शक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष श्रीधर आडे यांनी दिली.

# सारीपुत्त विहारात रोगनिदान शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ११ :**



मानेवाडा रोडवरील भीमबाग परिसरातील धम्म सेनानी सारीपुत्त बुद्ध विहारात मोफत रोग निदान व नेत्र तपासणी शिबिर संपन्न झाले, या शिबिराचे आयोजन बुद्ध विहार कमिटी व संकल्प महिला मंडळांनी केले होते. या शिबिराला सोमवारी पेठ येथील राज्य कामगार विमा योजनेचे वैद्यकीय अधिकारी डॉ हर्षवर्धन कांबळे, नेत्र चिकित्सक डॉ वारजुरकर यांनी उपचार केले. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून सामाजिक कार्यकर्ते रंजनाताई ढोरे, मंगेश ठाकरे, आनंद सोमकुवर, उत्तम शेवडे, ज्योती गजभिये उपस्थित होते. याप्रसंगी आयुष्मान कार्ड, त्याचे महत्त्व, महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना बाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहदेव पिल्लेवान, सूत्रसंचालन सुनिता मोटघरे तर समारोप सीमा चवरे यांनी केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधाकर रंगारी, बालकदास बावनगडे, प्रदीप मेश्राम, शिशुपाल सहारे, उपेंद्र चौरे, किशोर शेंडे, मंदा लोखंडे, मालती रामटेके, भारती वासनिक, कचराबाई पाटील, चंदा भांदककर, अनुसया आटे, उत्तमराव मोटघरे, सुनीता मोटघरे, वैशाली कांबळे, जयश्री बावनकर, सुशीला रंगारी, कल्पना शेंडे, देवानंद दुधे, शुभांगी मून, करुणा चहांदे, भावना नगरारे, वर्षा चहांदे, बबीता कांबळे, शोभा भगत, ज्योती पुनवटकर, ज्योती बाराहाते यांनी विशेष परिश्रम घेतले.

# माउंट लिट्रा झी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी एचसीजी कॅन्सर सेंटरच्या चिकित्सक आणि केअरगिव्हर्ससोबत साजरी केली राखीपौर्णिमा

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ११ :**

सन्मान आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करत, माउंट लिट्रा झी स्कूल, नागपूरच्या विद्यार्थ्यांनी एचसीजी कॅन्सर सेंटर, नागपूर येथे राखीपौर्णिमेचा उत्सव साजरा केला. या उपक्रमाचा उद्देश संपूर्ण केअरगिव्हिंग टीमला त्यांच्या निःस्वार्थ समर्पणासाठी आणि कॅन्सर रुग्णांप्रती करुणामय सेवेसाठी गौरविणे हा होता.

रुग्णांच्या सुरक्षेचा विचार करून कार्यक्रम वेगळ्या परिसरात आयोजित करण्यात आला, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा कॅन्सर रुग्णांशी प्रत्यक्ष संपर्क होऊ नये. या दरम्यान विद्यार्थ्यांनी डॉक्टर, नर्स आणि इतर केअरगिव्हर्सना राखी बांधून समाज आणि आरोग्यसेवकांमधील विश्वास, काळजी आणि संरक्षणाचे बंधन अधिक मजबूत केले.

या प्रसंगी सुश्री नीता राजवार, मुख्य संचालन अधिकारी, एचसीजी कॅन्सर सेंटर, नागपूर यांनी सांगितले,"हा उत्सव फक्त एक सण नाही–तो आपल्याला आठवण करून देतो की रुग्णांप्रती आपले समर्पण हे समाजाप्रतीही एक वचन आहे. या छोट्या-छोट्या मुलांचे आम्ही आभारी आहोत, ज्यांनी आमच्या डॉक्टर, नर्स आणि केअरगिव्हर्सच्या कार्याची दखल घेतली." डॉ. नितीन बोमनवार, सहयोगी संचालक, सर्जिकल ऑन्कॉलॉजी, ज्यांनी देखील एका विद्यार्थ्याकडून राखी बांधून घेतली, म्हणाले,"राखीपौर्णिमा हा काळजी आणि संरक्षणाच्या वचनांचा सण आहे. आमच्यासाठी, मग तो डॉक्टर असो किंवा केअरगिव्हर, हे वचन आम्ही दररोज पाळतो.

# ओयो हॉटेलमध्ये तरुणीवर अत्याचार

**नागपूर :** ओयो हॉटेलमध्ये तरुणाने एका तरुणीवर जबरीने लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार पुढे आला आहे. याप्रकरणी गणेशपेठ पोलिसांनी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून आरोपी तरुणाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. स्वप्निल उमेश दुरगडे (27) रा. बेलोरगाव, चांदूरबाजार, अमरावती असे आरोपीचे नास आहे.

कोतवाली ठाण्यांतर्गत राहणारी पीडित तरुणी एका रुग्णालयात हाऊसकिपिंगचे काम करते. फेसबूकच्या माध्यमातून तिची आरोपी स्वप्निल याच्याशी ओळख झाली. दोघांमध्ये दररोज चॅटिंग होऊ लागली. ओळखीचे रुपांतर मैत्रीत आणि मैत्रीचे प्रेमसंबंधात व्हायला वेळ लागला नाही. 18 सप्टेंबर 2024 रोजी आरोपी पीडितेला भेटण्यासाठी नागपूरला आला. यादरम्यान तो पीडितेला ओयो हॉटेलमध्ये घेऊन गेला. तेथे लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर आरोपी पीडितेचे सतत लैंगिक शोषण करू लागला. पीडिता जेव्हाही लग्नाबाबत विचारत होती, तो टाळाटाळ करायचा. या दरम्यान पीडिता दोन महिन्यांनी गर्भवती झाली. तिने याबाबत आरोपीला सांगितले असता त्याने गर्भपात करण्यासाठी गोळ्या दिल्या.

# इको फ्रेंडली गणेशोत्सव स्पर्धेला बालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ११ :**




आमदार सांस्कृतिक महोत्सव समिती मध्य नागपूर तर्फे मध्य नागपूरचे आमदार प्रवीणजी दटके यांच्या संकल्पनेतून मध्य नागपूरात इको फ्रेंडली गणेश मूर्ति प्रशिक्षण व स्पर्धेचे आयोजन 10ऑगस्ट रोजी विविध ठिकाणी आयोजित करण्यात आले.

त्यात हिंदू मुलींची शाळा महाल, गांधीबाग उद्यान, शिव मंदिर जैसाव वाडी, कोलबा स्वामी, जुनी मंगळवारी, हनुमान मंदिर, नाईकवाडी येथे रविवारी सकाळी 8 वाजता 4 ते 14 या वयोगटातील बालकांनी आयोजित करण्यात आले. प्रशिक्षणाला लागणारी सर्व सामग्री निःशुल्क आयोजकांतर्फे पुरवण्यात आली. या काळात मुलं मोबाईल चा अनावश्यक वापर करायला लागलेले आहेत. मुलामधील कलागुनांना विकसित करून प्राचीन परंपरा जोपासण्याचे कार्य घडावे या दृष्टीने हा उपक्रम करण्यात आला. या प्रशिक्षण शिबिरात १००० हून अधिक मुल मुली उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी मूर्तिकार प्रमोद भीसेकर, हलबा समाज मूतीर्कार संघ नागपूर तर्फ ज्ञानेश्वरजी बारापात्रे, मोनलजी कोहाळ, सीताराम रामटेककर, राकेश पाठराबे, शेखर डेकाटे, देवरावजी नंदनवार, महेंद्र पराते,मनोज धार्मिक, हर्षल घोराडकर, प्रविन धकाते,राकेश भिवापुरकर मुकुंदा पंडित धर्मा बुरडे, शैलेंद्र चक्रवती, नीलम प्रजापती, हर्ष चीखाणे, अभिषेक कळमकर, दीप जोशी या मूतीर्कारानी प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमाची संकल्पना आमदार प्रवीण दटके यांची असून संयोजन नीरजा नागेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अश्विन निमजे, अविनाश अडकुलवार, दुर्गेश घाटोळे, ज्योती शिंपी, चित्रा डुमरे, विभा सावंत, मोहिनी अभ्यंकर यांनी सहकार्य केले.

# विकलेला भूखंड गहाण ठेवून फसवणूक

**नागपूर :** विकलेला फ्लॅट २५ लाखांत गहाण ठेवून सराफा व्यापाऱ्याची फसवणूक करण्यात आली. ही घटना बेलतरोडी ठाण्यातर्गत उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी फियार्दी विश्वास बंडेवार (५२) रा. तामसा, नांदेड यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे. राजेश बोकीनपल्लेवार (५६) रा. माटे चौक असे आरोपीचे नाव आहे. बंडेवार हे सराफा व्यवसायी आहेत. त्यांनी दहा वर्षांपूर्वी राजेशकडून रिध्दी सिध्दी विनायक अपार्टमेंट, बेसा येथील ए विंग मधील १०३ क्रमांकाचा फ्लॅट २३ लाख ८३ हजारात खरेदी केला. फिर्यादीने फ्लॅटचा ताबाही घेतला. त्या फ्लॅटमध्ये बंडेवार यांचा भाचा शशांक चिदूलवार राहतो. दरम्यान आरोपीने कुठल्याही प्रकारची परवागी न घेता बंडेवार यांचा फ्लॅट पुसद को-ऑपरेटीव्ह बँकेच्या नरेंद्रनगर शाखेत २५ लाख रुपयांत गहाण ठेवून फिर्यादीची बंडेवार यांची फसवणूक केली. बँकेचे कर्मचारी फ्लॅटवर आल्यानंतर या प्रकरणाचा भंडाफोड झाला. त्यांनी लागलीच पोलिस ठाणे गाठून घटनेची तक्रार दिली.

# कचरा संकलनात त्रुटी आढळल्याने एजी आणि बीव्हीजीवर १० टक्के दंड

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. ११ :**

नागपूर शहरात कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या मे. बीव्हीजी इंडिया लिमिटेडच्या व मे. एजी एनव्हायरो इन्फ्रा. प्रा.लि. यांच्या वाहनांच्या स्थितीमध्ये तसेच कामात अनेक त्रुटी आढळून आल्याने नागपूर महानगरपालिकेने या दोन्ही कंपनीच्या एक महिन्याच्या देयकांतून १० टक्के रक्कम कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात एजी आणि बीव्हीजी इंडीया कंपनीला आज ( ता.५) नोटीस बजावली असून वाहनांच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात २४ तासाच्या आत नोटीसचे उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत.

नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त (शहर) वसुमना पंत यांनी गेल्या २१ जुलैला बीव्हीजी इंडीया लिमीटेडतर्फे कचरा संकलन होणाऱ्या भागाचा दौरा केला. एजी एनव्हायरो इन्फ्रा. प्रा.लि यांच्या कडे मनपाच्या झोन क्र. १ ते ५ आणि बीव्हीजी इंडीयाकडे झोन क्रमांक ६ ते झोन क्रमांक १० मधील कचरा संकलित करणे तसेच या कचऱ्याची वाहतूक करण्याची जबाबदारी आहे. अतिरिक्त आयुक्त \वसुमना पंत यांनी गेल्या २१ जुलैला एजी आणि बीव्हीजीतर्फे करण्यात येत असलेल्या कामाची पाहणी केली. यावेळी वाहनांमध्ये अनेक त्रुटी आढळून आल्याचे निर्दशनास आले. अनेक वाहनांच्या नंबर प्लेट सुस्थितीत नव्हत्या. वाहनांची नोंदणी झालेली नव्हती, काही वाहनांचे पीयूसी काढलेले नव्हते. काही वाहनचालकांकडे वाहने चालविण्याचा परवाना नव्हता, कचरा संकलित करण्यासाठी वाहनांमध्ये निळा व हिरवा रंगाचे दोन कप्पे आवश्यक आहे. हे कप्पे अनेक वाहनांमध्ये आढळून आले नाही. एकूण वाहनांपैकी जवळपास ७० टक्के वाहने अस्वच्छ होती. तसेच अर्ध्या वाहनांमध्ये कचरा भरल्यानंतर त्यावर आवरण टाकण्यात आलेले नसल्याचे आढळून आले आहे. या सर्व त्रुटी गंभीर असून मनपासोबत झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग करणाऱ्या आहेत.

या गंभीर त्रुटी आढळून आल्याने करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन केलेले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यासंदर्भात संबंधित कंपनीला वारंवार सूचना देऊनही या स्थितीमध्ये बदल झालेला नाही. यामुळे काही वर्तमानपत्रांमध्ये येत असलेल्या बातम्यांमुळे मनपाची प्रतिमा मलिन होत आहे. वारंवार दिल्या जाणाऱ्या सूचना व त्या सूचनांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्याने आपल्यावर कारवाई कां करू नये, अशी कारणे दाखवा नोटीस या पत्राद्वारे एजी आणि बीव्हीजी इंडिया कंपनीवर बजावली आहे. निरीक्षणात आढळून आलेल्या वाहनांच्या स्थितीबाबतचे स्पष्टीकरण २४ तासात मागितले आहे. कचरा संकलन व वाहतूक करताना झालेल्या करारनाम्यातील भंगामुळे ऑगस्ट २०२५ च्या देयकातून १० टक्के रक्कम वाहनांच्या स्थितीमध्ये सुधारणा करेपर्यंत कपात येईल, असे नोटीसमध्ये म्हटले आहे.

# महिला काँग्रेसने पोलीस स्टेशनमध्ये साजरे केले रक्षाबंधन








■ **महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ११:**
आपल्या कर्तव्याला प्राधान्य देत सदैव जनतेच्या रक्षणार्थ कार्य करणारे पोलिस प्रशासन कुटुंबाच्या आनंदावर विरजण घालत नेहमी जनतेच्या सेवार्थ कार्य करते.

त्यांनाही एखाद्या सणाचा आनंद घेता यावा, या उदात्त भावनेने प्रेरित होवुन हिंगणा तालुका महिला काँग्रेस व स्वराज्य सेना यांच्या संयुक्त विद्यमाने महिला काँग्रेस अध्यक्ष ज्योत्स्ना रहांगडाले यांच्या संकल्पनेतून स्वराज्य सेना संस्थापक अध्यक्ष शशिकांत थोटे यांच्या मार्गदर्शनात एम आयडीसी पोलीस स्टेशन येथे सामुहिक रक्षाबंधन साजरे करण्यात आले. या प्रसंगी वरीष्ठ पोलिस निरीक्षक गोकुळ महाजन यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या उपक्रमाकरिता महिला काँग्रेस तालुकाध्यक्ष ज्योत्स्ना रहांगडाले, माजी तालुकाध्यक्ष ओबीसी राष्ट्रीय महासंघ सायली थोटे, दिपाली वर्मा, उज्वला खुंभळकर, प्रेरणा पटले, समीक्षा रहांगडाले, अश्विनी तायडे, लक्ष्मी नेताम, जमना रहांगडाले, विद्या सराडे, वर्षा ताई धुर्वे, प्रियांका पाटीदार, शालू भोयर,रेखा खरे, यमुना कागले, तारा वालखरे, नंदाताई ढाकणे रेखा नागपूरे, मंजुषा पटले, सिंधू बिसेन , सुलोचना ठाकरे, गीता बिसेन, शारदा चौधरी, शीला बावणे, अदिती सिंह, सलोनी सिंह, पूर्वा चित्रिव, शालू भोयर, दिपाली पाटील, नंदा मेश्राम यांच्यासह महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# आपच्या नवीन जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन





■ **महासागर प्रभाग मित्र नागपूर, दि. ११ :**
आम आदमी पार्टी उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्रात प्रभाग क्रमांक ६ मध्ये वैशाली नगर चौक, जवेरी हॉस्पिटल जवळ आप अनुसूचित जाती आघाडी, नागपूर शहर अध्यक्ष प्रशांत अंबादास मेश्राम यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन त्यांच्या मातोश्री श्रीमती सीताबाई मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी भूषण ढाकुलकर, डॉ. शाहिद अली जाफरी, सुनीलदादा वडसकर, वृषभ वानखेडे, डॉ. अमेय नारनवरे, रोशन डोंगरे, प्रदीप पौनीकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. सौ. नीलम नारनवरे यांनी या कार्यक्रमाचे संचालन केले. कार्यक्रमाला आपचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी मशाल यात्रा

## हजारो संयमित पावले संविधान चौकाकडे




■ **महासागर प्रभाग मित्र नागपूर, दि. ११ :**
महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या या मुख्य मागणीसाठी भव्य मशाल यात्रा नुकतीच नागपूरमधील इंदोरा मैदानातून संविधान चौकाकडे शिस्तबद्ध पद्धतीने निघाली.

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या मशाल यात्रेचे नेतृत्व आकाश लामा यांनी केले. यात्रेची सुरुवात त्रिशरण आणि पंचशील घेऊन करण्यात आली. हे आंदोलन प्रामुख्याने बोधगया टेम्पल ॲक्ट १९४९ रद्द करा आणि महाबोधी महाविहाराचा संपूर्ण कारभार बौद्ध समाजाकडे सोपवा या दोन प्रमुख मागण्यांवर आधारित होते. महाबोधी महाविहार हे बौद्ध धमीर्यांचे सर्वोच्च तीर्थक्षेत्र असूनही त्याच्या व्यवस्थापनात आजही बौद्ध समाजाला पूर्ण अधिकार नाहीत. या पार्श्वभूमीवर हा संघर्ष अधिक तीव्र करण्यात आला आहे. मशाल यात्रेचे समापन संविधान चौकात झाले, जिथे विविध सामाजिक, धार्मिक संघटनांचे प्रतिनिधी आणि बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या आंदोलनात ऑल इंडिया बुद्धिष्ट फोरमदी बुद्धिष्ट सोसायटी, समता सैनिक दल, भिक्खू संघ, महिला सशक्तिकरण संघ, समस्त बुद्ध विहार समिती यांच्यासह विविध सामाजिक व धार्मिक संस्थाचा सहभाग होता.

सुनील सरिपुत्त, प्रकाश दार्शनिक, अशोक जांभुळकर, भंते चंद्रकिर्ती, भंते प्रज्ञाशील, भंते धम्मतप, शंकरराव ढेंगरे, चंद्रबोधी पाटील, मुरलीधर मेश्राम यांचा प्रामुख्याने समावेश होता. हजारोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी आणि आंदोलनकर्ते या यात्रेत सहभागी झाले होते.

## समस्या निकाली न निघाल्यास आंदोलन

■ **महासागर प्रभाग मित्र हिंगणा/नागपूर, दि. ११ :**
ग्रामपंचायत इसासनी अंतर्गत वाघधरा, शिवनगर, ओम नगर, सौदामिनी चौक, शुभम नगर यांसारख्या अनेक भागांचा विकास झाला नसून, या भागात रस्ते, नाल्या, पिण्याचे पाणी अशा पुरेशा सोयी नाहीत. रस्त्यांच्या कडेला नाल्यांची योग्य व्यवस्था नसल्यामुळे पावसाळ्यात रस्त्याचे पाणी लोकांच्या घरात शिरते. अशा मुलभूत सुविधांसाठी या भागातील नागरिकांनी अनेकदा शासन व प्रशासनाकडे धाव घेतली, मात्र परिणाम शून्य आहे.

### जनकल्याण संघाचा इशारा



शुभम नगर ते शिवनगरपर्यंत रस्ते व नाल्यांचे बांधकाम करण्यात यावे, रात्रीच्या वेळी पोलीस पेट्रोलिंगसह प्रमुख चौकात कॅमेऱ्यांची सोय करण्यात यावी, सरकारी जमिनी अतिक्रमणमुक्त करून त्या जनहिताच्या कामांसाठी वापरल्या जाव्यात, प्रत्येक घरात नळपाण्याची योग्य व्यवस्था करून शुद्ध पाणी नियमितपणे सर्व वॉर्ड व वस्त्यांमध्ये उपलब्ध व्हावे, सर्व शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करावा, मोफत शिक्षण बंधनकारक करण्यात यावे, अशा अनेक मागण्या जनकल्याण संघाच्यावतिने करण्यात आल्या आहेत

या मागण्या परिसरातील नागरिकांच्या मूलभूत गरजा व जीवनमान उंचावण्याशी निगडित असल्यामुळे शासन, प्रशासनाने प्राधान्याने विचार करावा, अशी मागणी जनकल्याण संघाचे सदस्य अरविंद पेटकर, राकेश देवलकर, राधेश्याम राय, प्रफुल पांडे, सज्जन तिवारी, नरेश अंबुले, योगेश कडवे, सुधाकरराव देशमुख, रविंद्र पारधी, बृजेश तिवारी, शालू तिवारी, कोमल, सूरज चौधरी, राजेश्वर बिलोने, प्रभाकर सोनटक्के, धर्मेंद्र ठाकरे, लालचंद शरणागत, अशोक दुबे, सुभाष राठोड, दीपक कळसकर, जयराम जांभळे, बंडू रांहगडाले, टेकेलाल पारधी, तळवेकर, हरिणखेडे आदींनी केली आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## महासागर प्रभाग वार्ता

# विहाराच्या सौंदर्यीकरणाची मागणी

■ **प्रभू गजभिये, नागपूर, दि. ११ :**
प्रभाग क्र. २ इंदोरा येथील रिपब्लिकन नगरात असलेल्या श्रावस्ती बुद्ध विहाराच्या प्रांगणात मोठ्या प्रमाणावर तण, झाडे व झुडपे उगवली असून, विहाराकडे जाणारा रस्ता खचला आहे. परिणामी, उपासक-उपासिकांना ये-जा करताना अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

प्रांगणातील काही ठिकाणी पाणी साचून डास व माशांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून, परिसरात आजार पसरण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. तण व झुडपे कापून, सुंदर फुलझाडे, मुलांसाठी खेळणी व ग्रीन जिम बसवून विहाराचे सौंदर्यीकरण करण्याची मागणी सुरेंद्र साखरे, कमल मुंघाटे, राजेश जांभूळकर, योगेश राऊत यांच्यासह अनेक नागरिकांनी केली आहे.



# कर्मचारी जाळतात दाट वस्तीत कचरा



■ **महासागर प्रभाग मित्र, नागपूर, दि. ११ :**
प्रभाग क्र. ५,मध्ये नागपूर महानगरपालिकाचे सफाई कर्मचारी कचरा जमा करून दाट वस्तीत जाळत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

कचरा जाळल्याने वातावरणात विषारी धूर आणि प्रदूषण पसरते, ज्यामुळे श्वसनविकार, त्वचारोग आणि इतर आरोग्य समस्या उद्भवू शकतात.
सफाई कर्मचाऱ्यांकडून कचरा जाळणे ही एक मोठी समस्या झाली आहे. यासंदर्भात आम आदमी पक्षाच्यावतिने वेळोवेळी तक्रारी नोंदवण्यात आल्या, पण कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

सतरंजीपुरा झोनच्या संबंधित विभागाच्या हलगर्जीपणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून नागरिक आता संताप व्यक्त करू लागले आहे.

दाट वस्तीत कचरा जाळणे बंद केले नाही तर आम आदमी पक्षाच्यावतिने तिव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रदिप पौनीकर, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभ, नानक धनवानी, संदीप साखरे, केतन ठाकूर, सुनिल गजभिये, मनोज फटींग, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते, नागसेन सहारे, कृष्णा पाठराबे, अंशु बिरेवार, संजू पटले, अरुण गुणारकर, बाबुराव निमजे, आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी दिला आहे .

# बातमी झळकताच रस्त्याच्या कामाला सुरूवात




■ **प्रफुल्ल पाटणकर, ईसासनी, नागपूर, दि. ११ :**
सिमेंट रस्त्याचे निकृष्ट काम या शीर्षकाखाली महासागरने वृत्त प्रकाशित करताच यंत्रणेने दखल घेतली आणि कामाला सुरूवात केली. लोकमान्य मेट्रो स्टेशन ते लता मंगेशकर हॉस्पिटल मार्गे सुमंगल विहार ते इसासनीकडे जाणाऱ्या मार्गावरील राय टाउन २ जवळील नाल्यावर खड्ड्यांची संख्या वाढल्यामुळे अपघातांच्या घटना वाढल्या होत्या. ही बाब लक्षात घेऊन दैनिक महासागरने २२ जुलै रोजीच्या अंकात समस्या उजागर केली.

ईसासनी ग्रामपंचायतीने याची गंभीर दखल घेऊन या रस्त्याच्या दुरुस्तीची कामे लगेच सुरू केली. सरपंच अरविंद ढोणे यांनी तातडीने दखल घेतल्याबद्दल रहिवाशांनी त्यांचे आभार मानले. ग्रामपंचायत सदस्य लहानु जीवतोडे, सौ. प्रीती चंद्रशेखर राऊत, भाजपा डिगडोह महामंडळाचे महामंत्री चंद्रशेखर राऊत उपस्थित होते.
काम पूर्ण होईपर्यंत नागरिकांना ये-जा करताना होणाऱ्या गैरसोयीबद्दल सहकार्य करण्याचे आवाहन ग्रामपंचायतने केले आहे.

# हेमू कॉलनी चौकात कचऱ्याचा प्रश्न गंभीर



■ **महासागर प्रभाग मित्र, नागपूर, दि. ११ :**
प्रभाग क्रमांक ७ अंतर्गत जरीपटक्यातील शहीद हेमू कॉलनी चौकात, संकटमोचन हनुमान मंदिरासमोर कचऱ्याचा मोठा ढिगारा साचलेला असून, नागरिक आणि दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.
या परिसरात अनेक शाळा, कॉलेज आणि बाजारपेठा असल्यामुळे विद्यार्थी, व्यापारी व ग्राहकांचे रोजच्याच मार्गावर हे कचऱ्याचे ढिगारे अडथळा निर्माण करत आहेत. विशेषतः पायी चालणाऱ्यांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो.
स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तक्रार करत सांगितले की, सफाईचे नियमित काम होत नाही, त्यामुळे परिसरात अस्वच्छता पसरते आणि आरोग्याच्या दृष्टीने धोका निर्माण झाला आहे.
नागरिकांची मागणी आहे की, महानगरपालिकेने येथे दररोज स्वच्छता मोहीम राबवावी व कचरा उचलण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, जेणेकरून मंदिर परिसर, बाजारपेठ आणि शैक्षणिक संस्थांमधील वातावरण स्वच्छ आणि आरोग्यदायी राहील.

# शांती नगर मैदानावर वृक्षारोपण

■ **महासागर प्रभाग मित्र, नागपूर, दि. ११ :**
सहयोग फाउंडेशनच्यावतिने शांती नगर मैदानावर कदंब रोपट्यांची लागवड करण्यात आली. रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून फाऊंडेशनचे पदाधिकारी आणि सभासदांनी पर्यावरण संरक्षणाचा ध्यास घेत हा उपक्रम राबविला.



# रमणा मारोती मंदिराची युथ फाऊंडेशन कडून स्वच्छता

■ **महासागर प्रभाग मित्र, नागपूर, दि. ११ :**
आपले मंदिर, स्वच्छ मंदिर या अभियानांतर्गत रमणा मारोती युथ फाऊंडेशनद्वारे रमणा मारोती मंदिराची स्वच्छता करण्यात आली. यामध्ये रमणा मारोती मंदिर ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मोलाचा सहभाग घेतला. मंदिर परिसराची संपूर्ण स्वच्छता करण्याबरोबरच मंदिर परिसरातील मुख्य मूर्ती परिसर, त्याचबरोबर सर्व टाइल्स, मागच्या भागाला असलेला कचरा, बेसिन परिसर स्वच्छ करण्यात आला.

या संपूर्ण उपक्रमात युथ फाऊंडेशनचे प्रविण उरकुंडे, लोकेश झुणके, रितेश मुरोडिया,श्रीकांत कळंबे,मयुर कुथे, सतिश नंदनवार, नितीन शेरजे, स्वप्नील गभने, निलेश राऊत यांनी प्रामुख्याने सहभाग घेतला.

